ePaper

## तृणमूल काँग्रेस हे नाव आणि पक्षचिन्ह निवडणूक आयोगाने गोठवलं



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™



पान 3 वरुन...

महापालिकेच्या बांधकाम विभागात कथित भ्रष्टाचार

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 18 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते SEMICON India 2026 चे उदघाटन

# भारताची 'सेमीकंडक्टर गरुडझेप'







**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**सेमीकॉन इंडिया 2026 च्या माध्यमातून भारताने मोठी झेप घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते SEMICON INDIA 2026 चे उद्घघाटन झाले. भारताच्या सेमीकंडक्टर इकोसिस्टिमचा झपाट्याने विकास होण्यासाठी ही परिषद महत्त्वाची मानली जात आहे. नवी दिल्लीतील यशोभूमी येथे मोदींनी या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे भव्य उद्घघाटन केले. या परिषदेत "सिलिकॉन ते सिस्टिम्स: बिल्डिंग द इकोसिस्टिम" ही महत्त्वाची संकल्पना आहे.**

इंडिया सेमीकंडक्टर मिशनचा देशात दुसरा टप्पा सुरू आहे. त्यासाठी 8 अब्ज डॉलर्सवरून निधी थेट 13.5 अब्ज डॉलर्सवर पोहचला आहे. आतापर्यंत देशातंर्गत 12 चिप, सेमीकंडक्टर निर्मिती प्रकल्पांना मंजूरी मिळाली आहे. येत्या काही काळात ही संख्या वाढण्याची शक्यता आहे. तर नुकतेच मोहाली आणि सुरत येथे दोन सेमीकंडक्टर प्रकल्पांमध्ये व्यावसायिक उत्पादनाला सुरुवातही झाली आहे. भारतातील निर्मित चिप आता परदेशातही निर्यात होत आहे. हे देशाचे मोठे पाऊल मानल्या जात आहे. तैवान, चीन, दक्षिण कोरिया, अमेरिका, जर्मनी यांच्यात पंक्तीत भारत बसला नाही तर लवकरच या क्षेत्रात दबदबा निर्माण करण्यात येणार आहे.

या जागतिक प्रदर्शनात 600 हून अधिक प्रदर्शक, 300 हून अधिक आंतरराष्ट्रीय कंपन्या आणि 50 हून अधिक देशांचे प्रतिनिधींनी हजेरी लावली आहे. जपान, दक्षिण कोरिया, मलेशिया, नेदरलँड्स, सिंगापूर आणि स्वीडन देशातील तज्ज्ञ संमेलनात सहभागी झाले आहेत.

### मंदीच्या काळातही विकासाची घोडदौड

या कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठे भाष्य केले. एका बाजूला भारतीय अर्थव्यवस्थेने जागतिक मंदीच्या काळातही 7.8 टक्के विकास दर गाठला आहे, असे मोदी म्हणाले. जपानच्या क्रेडिट रेटिंग एजन्सीने भारताचे सॉव्हरेन रेटिंग वाढवणे हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विश्वासाचा पुरावा असल्याचे मोदी म्हणाले. ब्रिक्स परिषदेत नवी दिल्ली जाहीरनामा सर्वसंमतीने स्वीकारण्यात आला. त्याचा उल्लेख करत हे भारताचा वाढत्या जागतिक प्रभावाचे प्रतिक असल्याचे मोदी म्हणाले.

### देशातील 200 स्टार्टअप्ससाठी सर्वात मोठी संधी

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि महाती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, गेल्या अनेक दशकांपासून सेमीकंडक्टरचा मुहूर्त साधायचा होता. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात हे स्वप्न साकार होत आहे. आता सेमिकॉन 2.0 च्या माध्यमातून सेमीकंडक्टर डिझाईन, मशिन्स, मटेरिअल, मेमरी, सिलिकॉन या क्षेत्रात भरीव कामगिरी करण्यात येईल. या परिषदेमुळे देशातील किमान 200 स्टार्टअप्सांना मोठी संधी आणि पाठबळ मिळेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

# दहावी-बारावी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

## बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारीपासून; दहावीची १५ फेब्रुवारीपासून

**महाईन्यूज । पुणे**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या संभाव्य तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार इयत्ता बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १६ मार्च २०२७ या कालावधीत, तर इयत्ता दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२७ या कालावधीत होणार आहे. परीक्षांच्या नियोजनासाठी विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच कनिष्ठ महाविद्यालयांना या तारखांमुळे अभ्यासाचे वेळापत्रक आखता येणार आहे.**



### दहावी-बारावीच्या परीक्षांचे नियोजन स्पष्ट

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षांच्या संभाव्य तारखा जाहीर केल्या आहेत. बारावीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा २० जानेवारी ते ६ फेब्रुवारी, तर लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १६ मार्चदरम्यान होणार आहे. दहावीच्या प्रात्यक्षिक व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारी, तर लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते ११ मार्चदरम्यान घेण्यात येणार आहे. या तारखांमुळे विद्यार्थ्यांना अभ्यास, पुनरावृत्ती आणि परीक्षेच्या तयारीचे नियोजन करता येणार आहे. दरम्यान, या संभाव्य तारखा असून विषयनिहाय अंतिम वेळापत्रक मंडळाकडून स्वतंत्रपणे जाहीर केले जाणार आहे.

राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी परिपत्रकाद्वारे या तारखांची माहिती दिली. महाराष्ट्रातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावी आणि बारावीच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत.

बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षा २० जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत घेण्यात येणार आहेत. त्यानंतर ८ फेब्रुवारीपासून लेखी परीक्षेला सुरुवात होईल. बारावीची लेखी परीक्षा १६ मार्चपर्यंत चालणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना जानेवारीपासूनच प्रात्यक्षिक तसेच लेखी परीक्षेच्या तयारीचे नियोजन करावे लागणार आहे.

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षा २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत होणार आहेत. त्यानंतर १५ फेब्रुवारीपासून दहावीच्या लेखी परीक्षेला सुरुवात होईल. लेखी परीक्षा ११ मार्च २०२७ रोजी पूर्ण होणार आहे.

राज्य मंडळाने या तारखा जाहीर करण्यामागे विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी तसेच अध्ययन-अध्यापनाचे योग्य नियोजन करता यावे, हा उद्देश असल्याचे स्पष्ट केले आहे. परीक्षांच्या तारखा आधीच उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना विषयानुसार अभ्यासाचे नियोजन, सराव परीक्षा, लेखनाचा सराव आणि पुनरावृत्ती यासाठी पुरेसा वेळ मिळणार आहे.

विशेष म्हणजे, सध्या जाहीर करण्यात आलेल्या तारखा या संभाव्य स्वरूपाच्या असून विषयनिहाय अंतिम वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर केले जाणार आहे. राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर विषय, परीक्षा दिनांक आणि इतर आवश्यक तपशील उपलब्ध करून दिले जातील. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी सोशल मीडिया किंवा इतर अनधिकृत माध्यमांवर प्रसारित होणाऱ्या वेळापत्रकावर अवलंबून न राहता राज्य मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरील माहिती तपासणे आवश्यक आहे. दहावी आणि बारावीच्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा मानल्या जातात. त्यामुळे परीक्षा सुरू होण्यापूर्वी अभ्यासक्रम पूर्ण करणे, मागील प्रश्नपत्रिकांचा सराव करणे आणि नियमित पुनरावृत्ती करणे यावर विद्यार्थ्यांनी भर देणे अपेक्षित आहे. शिक्षक आणि पालकांनीही विद्यार्थ्यांवरील परीक्षेचा ताण कमी करून त्यांना अभ्यासासाठी सकारात्मक वातावरण देण्याची गरज आहे. दरम्यान, फेब्रुवारी-मार्च २०२७ च्या परीक्षांसाठी ऑनलाइन आवेदनपत्र प्रक्रियेबाबतची परिपत्रके राज्य मंडळाने यापूर्वीच प्रसिद्ध केली आहेत. दहावीच्या परीक्षेसाठी १८ ऑगस्ट २०२६ रोजी, तर बारावीच्या परीक्षेसाठी १४ ऑगस्ट २०२६ रोजी ऑनलाइन आवेदनपत्रांबाबत परिपत्रके प्रसिद्ध करण्यात आली आहेत.

# शिवजयंतीच्या प्रारंभाचे श्रेय महात्मा फुलेंना! खासदार डॉ. अमोल कोल्हे यांची भूमिका

**महाईन्यूज । पुणे**

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अखिल भारतीय राजभाषा संमेलनातील भाषणात शिवजयंती उत्सवाची सुरुवात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केल्याचे वक्तव्य केल्याच्या पार्श्वभूमीवर शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी ऐतिहासिक संदर्भ देत स्पष्टीकरण दिले आहे. शिवजयंतीच्या प्रारंभाचे श्रेय महात्मा जोतीराव फुले यांना जाते, असे त्यांनी समाजमाध्यमावरील पोस्टद्वारे म्हटले आहे.**



### पाठ्यपुस्तकातून इतिहास योग्य पद्धतीने मांडावा

शिवजयंतीच्या प्रारंभाचा हा ऐतिहासिक घटनाक्रम नव्या पिढीसमोर योग्य पद्धतीने मांडण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. कोल्हे यांनी म्हटले आहे. शिवाजी महाराजांच्या समाधीचा शोध घेण्याची वेळ का आली, त्यापूर्वीच्या काळात या इतिहासाकडे दुर्लक्ष झाले होते का, तसेच इतिहासाच्या मांडणीत कालांतराने बदल झाले आहेत का, असे प्रश्नही त्यांनी उपस्थित केले आहेत.

डॉ. कोल्हे यांनी आपल्या पोस्टमध्ये लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय कार्याचे महत्त्व मान्य करताना शिवजयंतीच्या प्रारंभाबाबत ऐतिहासिक घटनाक्रमाकडे लक्ष वेधले आहे. त्यांच्या मते, महात्मा फुले यांनी १८६९ मध्ये रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचा शोध घेतला आणि त्यानंतर शिवजयंती उत्सवाला सुरुवात केली. १८७० मध्ये पुण्यात सार्वजनिक स्वरूपात शिवजयंती साजरी झाल्याचा उल्लेख विविध स्रोतांमध्ये आढळतो.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी महात्मा फुले यांनी शिवरायांवर पोवाडा लिहिल्याचेही डॉ. कोल्हे यांनी नमूद केले. पुढील काळात लोकमान्य टिळकांनी शिवजयंती उत्सवाला व्यापक सार्वजनिक आणि राष्ट्रीय स्वरूप दिले, असा ऐतिहासिक संदर्भही उपलब्ध आहे. विद्यापीठीय अभ्यास साहित्यात लोकमान्य टिळकांनी १८९५ मध्ये शिवजयंती उत्सव सुरू केल्याचा उल्लेख असून, त्यामागे राष्ट्रीय भावना जागृत करण्याचा उद्देश असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

महात्मा फुले यांच्या योगदानाबाबत विविध ऐतिहासिक स्रोतांमध्ये १८६९-७० चा संदर्भ आढळतो; तर लोकमान्य टिळकांच्या योगदानाबाबत १८९५-९६चा कालखंड नमूद केला जातो. त्यामुळे 'शिवजयंतीची सुरुवात' आणि 'शिवजयंतीला व्यापक सार्वजनिक स्वरूप' या दोन वेगवेगळ्या ऐतिहासिक टप्प्यांचा संदर्भ लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते, असे खासदार कोल्हे यांनी स्पष्ट केले आहे.

# महापालिकेच्या बांधकाम विभागात कथित भ्रष्टाचार

## विरोधी पक्षनेते विनोद नढे यांचे आयुक्तांना निवेदन; कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचा गंभीर आरोप करत, मनपातील विरोधी पक्षनेते व नगरसेवक विनोद जयवंत नढे यांनी महापालिका आयुक्तांकडे या संपूर्ण प्रकरणाची त्रयस्थ यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी आयुक्तांना लेखी निवेदन सादर केले आहे.**



निवेदनानुसार, बांधकाम परवानगी विभागातील कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांच्याकडून प्रशमन शुल्क (कंपाउंडिंग चार्जेस) आकारणीत हेराफेरी केल्याच्या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. मात्र नढे यांच्या मते, ही कारवाई म्हणजे केवळ हिमनगाचे टोक असून, विभागात संघटितरीत्या कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवण्याचे रॅकेट अनेक वर्षांपासून सक्रिय असल्याचा त्यांना संशय आहे.

शहरातील अनेक निवासी व व्यावसायिक प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) देताना, नकाशे मंजूर करताना तसेच एफएसआय व विकास शुल्काची आकारणी करताना जाणीवपूर्वक कमी आकारणी केली गेल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. विकासकांच्या फायद्यासाठी महापालिकेच्या तिजोरीवर डल्ला मारून काही अधिकारी स्वतःची तुंबडी भरत असल्याचा ठपका नढे यांनी ठेवला आहे.

### कारवाईसाठी १५ दिवसांची मुदत, आंदोलनाचा इशारा

निवेदनाच्या शेवटी नढे यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे. महापालिकेचा महसूल लुटणाऱ्या आणि शहराच्या सुनियोजित विकासाचा बोजवारा उडवणाऱ्या भ्रष्ट यंत्रणेवर येत्या १५ दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास, महापालिका मुख्यालयासमोर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

### नढे यांच्या प्रमुख मागण्या

- **नियमबाह्य एफएसआय व आरक्षण उल्लंघनाची तपासणी** – विकास नियंत्रण नियमावलीचे (UDCPR) उल्लंघन करून रस्ता रुंदी व आरक्षणे डावलून अतिरिक्त एफएसआय दिला गेला का, तसेच बनावट कागदपत्रांच्या आधारे टीडीआर लोड केला गेला का, याची चौकशी व्हावी.
- **प्रत्यक्ष जागेवर तपासणी व बोगस ओसींची छाननी** – मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम नसताना, पार्किंगच्या जागेवर अनधिकृत वाणिज्यिक वापर होत असताना आणि अग्निशमन दलाचे नियम (FIRE NOC) धाब्यावर बसवले असतानाही ज्या प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्रे दिली गेली, त्यांची प्रत्यक्ष स्थळपाहणी करावी.
- **फायलींची अडवणूक व तांत्रिक ऑडिट** – लाच उकळण्यासाठी जाणीवपूर्वक क्षुल्लक त्रुटी काढून फायली महिनोन्महिने प्रलंबित ठेवल्या जात असल्याने, या प्रक्रियेचे तातडीने तांत्रिक व डिजिटल ऑडिट करावे.
- **स्वतंत्र त्रयस्थ यंत्रणेमार्फत ऑडिट** – गेल्या ३ ते ४ वर्षांत तसेच प्रशासक कालावधीत मंजूर झालेल्या सर्व फायलींची एका स्वतंत्र त्रयस्थ यंत्रणेमार्फत (THIRD PARTY TECHNICAL & FINANCIAL AUDIT) तपासणी व्हावी.
- **वरिष्ठ अधिकारी, वास्तुविशारद व विकासकांवरही कारवाई** – केवळ कनिष्ठ वा उपअभियंत्यांवर कारवाई न करता, गैरव्यवहारामागील सूत्रे हलवणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर, वास्तुविशारदांवर (आर्किटेक्ट्स) आणि विकासकांवरही गुन्हे दाखल करावेत.
- **व्याजासह महसूल वसुली** – नियमबाह्य सवलती देऊन पालिकेचे बुडवलेले कोट्यवधी रुपयांचे नुकसान संबंधित विकासक व दोषी अधिकाऱ्यांकडून व्याजासह वसूल करावे.

# पिंपरी-चिंचवड आरटीओकडून ३९५ वाहनांवर दंडात्मक कारवाई!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड यांच्या वतीने दि. १ ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत वाहनांची विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान वाहनांवरील नियमबाह्य काळी फिल्म, आकर्षक अथवा फॅन्सी नंबर प्लेट, HSRP नंबर प्लेट नसलेली वाहने तसेच इतर राज्यात नोंदणीकृत लक्झरी ट्रॅव्हल्स बसेसची तपासणी करण्यात आली.**




तपासणीदरम्यान मोटार वाहन कायदा व संबंधित नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत एकूण ३९५ चलन करण्यात आले असून, त्यापैकी १६७ चलनांचा भरणा करण्यात आला. त्यातून ८ लाख ९ हजार २७० रुपये दंड वसूल करण्यात आला.

कारवाईमध्ये नियमबाह्य काळी फिल्म प्रकरणी १६ चलनांपैकी ६ चलनांचा भरणा होऊन ३ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

HSRP नंबर प्लेट नसलेल्या वाहनांवर २७५ चलन करण्यात आले असून, १०६ चलनांचा भरणा होऊन १ लाख ८ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

फॅन्सी नंबर/नियमबाह्य नोंदणी क्रमांक दर्शविण्याच्या प्रकरणी ५९ चलनांपैकी ३२ चलनांचा भरणा होऊन २० हजार ५०० रुपये दंड वसूल करण्यात आला.

तसेच इतर राज्यातील नोंदणीकृत ट्रॅव्हल्स बसेसवर ४५ चलन करण्यात आले असून, २३ चलनांचा भरणा होऊन ६ लाख ७७ हजार ७७० रुपये दंड वसूल करण्यात आला.

वाहनमालकांनी आपल्या वाहनावर नियमबाह्य अथवा फॅन्सी नंबर प्लेट असल्यास ती तात्काळ काढून शासनाच्या नियमानुसार HSRP नंबर प्लेट बसवून घ्यावी. तसेच वाहनांच्या काचांना शासनाच्या नियमांचे उल्लंघन होईल अशा पद्धतीने काळी फिल्म लावू नये. वाहनांमध्ये अनधिकृत फेरबदल करून वाहनाची मूळ रचना अथवा सुरक्षा मानकांमध्ये बदल करू नये.

वाहनांची नंबर प्लेट शासनाने निर्धारित केलेल्या मानकांनुसार असणे आवश्यक आहे. वाहनांवर नियमबाह्य नंबर प्लेट, काळी फिल्म अथवा अनधिकृत फेरबदल आढळल्यास संबंधित वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड, पुणे यांनी कळविले आहे.

# विकसित भारताच्या समृद्धीचा नवा आधार



## भूमिका

**भारताची नील अर्थव्यवस्था देशाच्या आर्थिक विकासाला नवी दिशा देणारे महत्त्वाचे क्षेत्र ठरत आहे. मत्स्य व्यवसाय, सागरी संसाधने, शाश्वत मत्स्यपालन आणि मच्छीमारांचे सक्षमीकरण यांना केंद्रस्थानी ठेवून 'विकसित भारत @2047'च्या दिशेने वाटचाल सुरू आहे.**




भारताला ११,००० किलोमीटरहून अधिक सागरी किनारपट्टी आणि सुमारे २४ लाख चौरस किलोमीटरचे विशेष आर्थिक क्षेत्र लाभले आहे. या विशाल सागरी संपत्तीचा शाश्वत आणि आधुनिक पद्धतीने उपयोग करण्यासाठी केंद्र सरकारने मत्स्य क्षेत्राला विशेष महत्त्व दिले आहे. २०१९ मध्ये मत्स्यपालन, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाची स्थापना झाल्याने मत्स्य व्यवसायाला स्वतंत्र प्रशासकीय बळ मिळाले.

गेल्या दशकात भारत मत्स्य उत्पादनात जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश बनला असून, जागतिक मत्स्य उत्पादनात भारताचा वाटा सुमारे ८ टक्के आहे. जवळपास ३ कोटी मच्छीमार आणि मत्स्यपालकांच्या उपजीविकेला या क्षेत्राचा आधार आहे. २०२४-२५ मध्ये देशाचे मत्स्य उत्पादन १९५ लाख टनांहून अधिक झाले आहे.

विशेष आर्थिक क्षेत्र आणि 'हाय सीज'मध्ये शाश्वत खोल समुद्री मासेमारीला प्रोत्साहन देण्यासाठी नव्या नियमावली आणि मार्गदर्शक तत्त्वांची आखणी करण्यात आली आहे. यामुळे मच्छीमार सहकारी संस्था, मत्स्य उत्पादक संघटना आणि मच्छीमारांना नव्या सागरी संधींचा लाभ घेता येणार आहे. लक्षद्वीपसारख्या प्रदेशांमध्ये मत्स्यपालन विकास प्रकल्पांना मिळणारी चालना ही या परिवर्तनाचे उदाहरण आहे.

भारतीय सागरी उत्पादनांची निर्यात आज १२० हून अधिक देशांमध्ये होते. गेल्या आर्थिक वर्षात सागरी उत्पादन निर्यातीने सुमारे ७३ हजार कोटी रुपयांचा टप्पा गाठला. डिजिटल अधिकृतता, जहाजांचा मागोवा, आंतरराष्ट्रीय प्रमाणीकरण आणि आधुनिक शीतसाखळी यामुळे या क्षेत्रातील निर्यातीच्या संधी आणखी विस्तारू शकतात.

मात्र विकासासोबत पर्यावरणीय जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. बेकायदेशीर, अघोषित आणि अनियंत्रित मासेमारीला आळा घालत समुद्री जैवविविधतेचे संरक्षण करणे आवश्यक आहे. खोल समुद्रातील मासेमारीमुळे प्रक्रिया, पॅकेजिंग, वाहतूक, लॉजिस्टिक्स आणि निर्यात क्षेत्रात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात. महिलांसाठीही मूल्यवर्धित प्रक्रिया उद्योगात मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

नील अर्थव्यवस्था ही केवळ मासेमारीपुरती मर्यादित नसून विज्ञान, तंत्रज्ञान, नवोन्मेष, रोजगार, निर्यात आणि पर्यावरण संवर्धन यांना जोडणारी व्यापक आर्थिक संकल्पना आहे. शाश्वत विकास, मच्छीमारांचे सक्षमीकरण आणि सागरी संसाधनांचा जबाबदार वापर यांच्या माध्यमातून नील क्रांती भारताच्या आर्थिक प्रगतीला नवी गती देऊ शकते.

## प्रासंगिक »

# हरवलेली घंटा

**एका गावातील मंदिराची जुनी घंटा एके दिवशी अचानक गायब झाली. गावकऱ्यांनी खूप शोध घेतला, पण घंटा सापडली नाही. सगळे एकमेकांवर संशय घेऊ लागले. गावातील विठ्ठल नावाचा मुलगा मात्र शांतपणे मंदिराभोवती पाहत होता.**

त्याला मंदिराच्या मागे जमिनीवर काही ताज्या पावलांच्या खुणा दिसल्या. त्या खुणांचा मागोवा घेत तो जंगलाच्या दिशेने गेला. थोडे पुढे गेल्यावर त्याला काटेरी झुडपात घंटा अडकलेली दिसली. जोरदार वाऱ्यामुळे घंटा मंदिराच्या मनोऱ्यातून खाली पडून घसरत जंगलात गेली होती.

विठ्ठलने ती घंटा गावकऱ्यांना आणून दिली. सगळ्यांना आपली चूक समजली. संशय घेण्यापेक्षा शांतपणे विचार करून सत्य शोधणे अधिक योग्य आहे, हे गावकऱ्यांनी मान्य केले.

त्या दिवसापासून गावात कोणतीही अडचण आली की लोक आधी शांतपणे विचार करू लागले आणि मग निर्णय घेऊ लागले."

- तात्पर्य : **घाईचा संशय चुकीचा ठरू शकतो; सत्य शोधण्यासाठी संयम आवश्यक आहे.**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई, पुण्यासह विविध शहरांमध्ये नोकरी-व्यवसायानिमित्त राहणारे लाखो चाकरमानी आपल्या गावाकडे परतले आहेत. रेल्वे स्थानके, एसटी बसस्थानके आणि मुंबई-गोवा महामार्गावर वाढलेली गर्दी हे याचे चित्र आहे.

# शहरातून कोकणात बाप्पासाठी धाव



महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम काही ठिकाणी अपूर्ण असल्याने खड्डे, वाहतूक कोंडी आणि वाढलेला प्रवासाचा वेळ यामुळे अडचणी येत असल्या, तरी 'गणपतीला जायचेच' या भावनेत कोणतीही कमी झालेली नाही.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात गणेशोत्सवाला विशेष महत्त्व असून, कोकणातील गणेशोत्सवाची ओळख मात्र घरगुती परंपरा, साधेपणा आणि कौटुंबिक जिव्हाळ्याने निर्माण झाली आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यांत मिळून दोन लाखांहून अधिक घरगुती गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना झाली आहे. महागाईमुळे मूर्तींच्या किमती वाढल्या असल्या तरी भक्तांच्या उत्साहावर त्याचा परिणाम झालेला नाही.

गणेशोत्सवामुळे बंद असलेली घरे पुन्हा उघडली असून गावागावांत, वाड्यावस्त्यांत चैतन्य निर्माण झाले आहे. अनेक कुटुंबे शाडूच्या मातीच्या मूर्तींना प्राधान्य देत पर्यावरणपूरक उत्सव साजरा करत आहेत. विशेष रेल्वे आणि एसटी सेवांमुळे चाकरमान्यांचा गावाकडे परतीचा प्रवास सुलभ करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कोकणातील गणेशोत्सवाला धार्मिकतेसोबतच समृद्ध लोककलेची जोड आहे. सिंधुदुर्गात भजन, आरती आणि पखवाज-टाळांच्या गजराने रात्री जागतात, तर रत्नागिरीत जाखडी, शक्ती-तुरा आणि बाल्या नृत्याला रंग चढतो. डिजिटल युगातही या पारंपरिक कलांना मिळणारा प्रतिसाद कोकणच्या सांस्कृतिक मुळांची ताकद दाखवतो.

गणेशोत्सव हा ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना देणारा सण आहे. मूर्तिकार, सजावटकार, खाद्यपदार्थ बनविणाऱ्या महिला आणि स्थानिक विक्रेत्यांना या काळात मोठी आर्थिक संधी मिळते. त्याचबरोबर निर्माल्य संकलन, कृत्रिम विसर्जन कुंड, नैसर्गिक सजावट आणि प्लास्टिकचा मर्यादित वापर यामुळे पर्यावरणपूरक उत्सवाची जाणीवही वाढत आहे.

काही दिवसांनी बाप्पाला निरोप दिला जाईल आणि चाकरमानी पुन्हा शहरांकडे परततील. मात्र आरत्यांचे सूर, भजनांची रात्र, मोदकाचा सुगंध आणि कुटुंबीयांच्या भेटींच्या आठवणी वर्षभर मनात राहतील. म्हणूनच कोकणचा गणेशोत्सव भव्यतेपेक्षा भावनेचा, दिखाव्यापेक्षा श्रद्धेचा आणि गर्दीपेक्षा आपुलकीचा उत्सव आहे.

## ।। अभंगवाणी ।।



संवसारतापें तापलों मी देवा ।
करितां या सेवा कुटुंबाची ॥१॥

म्हणऊनी तुझे आठविले पाय ।
ये वो माझे माय पांडुरंगे ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दिशा सालियान प्रकरणावरून ठाकरेंचा इशारा

## दिशा सालियान मृत्यू प्रकरणाचा आमचा दुरान्वयेही संबंध नाही; उद्धव ठाकरे

**महाईन्यूज । नागपूर**

**दिशा सालियान मृत्यू प्रकरणावरून महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. या प्रकरणाशी ठाकरे कुटुंबाचा कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट करत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी वारंवार होणारे आरोप हे राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा दावा केला आहे. तसेच अशा प्रकारे आरोप आणि चारित्र्यहनन सुरूच राहिल्यास न्यायालयीन मार्गाचा अवलंब करावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.**



छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे यांनी दिशा सालियान प्रकरणावर भाष्य केले. दिशा सालियानचा मृत्यू दुर्दैवी असून तिच्या मृत्यूमागे नेमके काय घडले, याबाबत आपल्याला माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणाशी आपला किंवा आदित्य ठाकरे यांचा कोणताही संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

"दिशा सालियान मृत्यू प्रकरणाचा आमचा दुरान्वयेही संबंध नाही," अशी भूमिका उद्धव ठाकरे यांनी मांडली. या प्रकरणात वारंवार ठाकरे कुटुंबीयांची नावे घेतली जात असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. कोणत्याही व्यक्तीचे नाव एखाद्या प्रकरणात जोडले जाऊ शकते, असे सांगताना त्यांनी या प्रकारावर प्रश्न उपस्थित केला.

आदित्य ठाकरे यांनीही यापूर्वी समाजमाध्यमातून दिशा सालियान यांना आपण कधी भेटलो नसल्याचे किंवा त्यांना ओळखत नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांच्या नावाचा या प्रकरणाशी संबंध जोडणे हा पुराव्याविना केला जाणारा आरोप असल्याचे त्यांनी म्हटले होते. त्यामुळे या प्रकरणात ठाकरे कुटुंबीयांकडून सातत्याने आपली भूमिका स्पष्ट करण्यात येत आहे.

दिशा सालियान मृत्यू प्रकरणाची चौकशी यापूर्वी विशेष तपास पथक अर्थात एसआयटीकडून करण्यात आली होती. मात्र, या प्रकरणावरून गेल्या काही वर्षांपासून विविध राजकीय आरोप होत राहिले. आता मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर या प्रकरणाच्या तपासाची दिशा पुन्हा चर्चेत आली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने सप्टेंबरच्या सुरुवातीला दिशा सालियान यांच्या मृत्यूची चौकशी केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयकडे सोपविण्याचा आदेश दिला होता. हा आदेश दिशा सालियान यांचे वडील सतीश सालियान यांनी दाखल केलेल्या याचिकेच्या पार्श्वभूमीवर देण्यात आला. त्यानंतर सीबीआयने या प्रकरणात गुन्हा नोंदवला असून, उपलब्ध वृत्तांनुसार एफआयआरमध्ये कोणत्याही व्यक्तीला आरोपी म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेले नाही. त्यामुळे या तपासातून पुढे कोणती माहिती समोर येते, याकडे आता लक्ष लागले आहे. उद्धव ठाकरे यांनी मात्र तपासाला विरोध करण्याची भूमिका घेतलेली नसल्याचे स्पष्ट केले. "ज्यांना चौकशी करायची आहे त्यांनी चौकशी करावी," अशी भूमिका त्यांनी मांडली. मात्र, चौकशीच्या नावाखाली वारंवार कुटुंबीयांचे चारित्र्यहनन केले जात असेल, तर ते सहन केले जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

### प्रकरण पुन्हा चर्चेत का?

दिशा सालियान यांच्या ८ जून २०२० रोजी झालेल्या मृत्यूनंतर या घटनेभोवती विविध तर्क-वितर्क निर्माण झाले. त्या अभिनेता सुशांत सिंह राजपूत यांच्या माजी व्यवस्थापक असल्याने १४ जून २०२० रोजी झालेल्या सुशांत सिंह राजपूत यांच्या मृत्यूशीही या घटनेचा संबंध असल्याच्या चर्चा झाल्या. आता मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर दिशा सालियान मृत्यू प्रकरणाचा तपास सीबीआयकडे गेला आहे. सीबीआयने प्रकरणात एफआयआर नोंदवला असून, उपलब्ध माहितीनुसार त्यात कोणत्याही व्यक्तीला आरोपी म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेले नाही. त्यामुळे पुढील तपासातून काय निष्पन्न होते, याकडे लक्ष आहे.

## अनुसूचित जमाती प्रवर्गातून धनगर समाजाला आरक्षण द्या अन्यथा जागा दाखवून देऊ

**महाईन्यूज । परभणी**

**धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी गुरुवारी (१७ सप्टेंबर) परभणीत धनगर समाजाच्या वतीने भव्य महामोर्चा काढण्यात आला. या महामोर्चासाठी परभणी जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांतून धनगर समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात झालेल्या महामेळाव्याला मोठी गर्दी झाली होती. आरक्षणाच्या मागणीवर शासनाने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.**



या महामोर्चात विविध राजकीय पक्षांशी संबंधित धनगर समाजातील नेतेही सहभागी झाले होते. समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्र येण्याची भूमिका उपस्थित नेत्यांनी मांडली. खासदार रामराव वडकुते, सुरेश भुमरे, विठ्ठलराव रखडे, गणेश हाके, रामकिशन रौंदळे, मारोतराव बनसोडे यांच्यासह विविध नेते यावेळी उपस्थित होते. समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नासाठी सर्वांनी एकत्रितपणे लढा देण्याची गरज असल्याचे आवाहन करण्यात आले.

महामोर्चाला संबोधित करताना धनगर आरक्षण आंदोलनाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याचे आश्वासन भाजपच्या नेत्यांनी यापूर्वी दिले होते. त्या आश्वासनाच्या पार्श्वभूमीवर धनगर समाजाने भाजपला पाठिंबा दिला आणि केंद्र तसेच राज्यात भाजपची सत्ता आली, असा दावा बोऱ्हाडे यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत केलेल्या वक्तव्यांचा संदर्भ देत बोऱ्हाडे यांनी सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी, अशी मागणी केली. धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात यावा, अन्यथा आगामी निवडणुकांमध्ये सरकारला त्याची जाणीव करून दिली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. धनगर समाजाला अनेक वर्षांपासून आरक्षणाच्या प्रश्नाला सामोरे जावे लागत असल्याने समाजाचे शैक्षणिक आणि सामाजिक नुकसान झाले असल्याचे बोऱ्हाडे यांनी नमूद केले. आरक्षण यापूर्वीच मिळाले असते तर समाजातील अनेक युवकांना शिक्षण आणि रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध झाल्या असत्या, असे त्यांनी सांगितले.

### महामोर्चानंतरही बोऱ्हाडेंचा ठिय्या

महामोर्चा आणि सभा संपल्यानंतरही धनगर आरक्षण आंदोलनाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांनी सभास्थळावरून न हटण्याची भूमिका घेतली. मागण्यांबाबत ठोस निर्णय होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

### राजकीय मतभेद बाजूला

परभणीतील महामोर्चात धनगर समाजातील विविध राजकीय पक्षांशी संबंधित नेते एकाच व्यासपीठावर उपस्थित होते. समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर राजकीय भूमिका आणि पक्षीय मतभेद बाजूला ठेवून एकत्र येण्याची भूमिका नेत्यांनी मांडली. आरक्षणाच्या मागणीसाठी समाजाची एकजूट महत्त्वाची असून, सामूहिक ताकदीने शासनाकडे मागणी लावून धरावी, असे आवाहन करण्यात आले. राज्यातील विविध जिल्ह्यांतून समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने महामोर्चाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले.

# युद्धनौकेच्या धडकेनंतर पाकिस्तानच्या उलट्या बोंबा

## भारतीय नौकेवर आरोप करत भारतीय उच्चायुक्तांना इस्लामाबादमध्ये बोलावलं

**महाईन्यूज** | नवी दिल्ली

**उत्तर अरबी समुद्रात भारतीय नौदलाची युद्धनौका आणि पाकिस्तानच्या नौदलाचे 'पीएनएस हुनैन' हे गस्ती जहाज यांच्यात झालेल्या धडकेनंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला आहे. १५ सप्टेंबर रोजी ही घटना घडली. या घटनेनंतर भारताने पाकिस्तानच्या नौदलाच्या वर्तनावर तीव्र आक्षेप नोंदवत पाकिस्तानच्या राजनैतिक प्रतिनिधीला पाचारण केले. त्यानंतर पाकिस्ताननेही भारतावरच आरोप करत इस्लामाबादमधील भारतीय राजनैतिक प्रतिनिधीला समन्स बजावले आहे. त्यामुळे समुद्रातील या घटनेचे पडसाद आता राजनैतिक पातळीवर उमटू लागले आहेत.**



### पाकिस्तानचा वेगळा दावा

भारताच्या आरोपांनंतर पाकिस्ताननेही आपली भूमिका स्पष्ट केली आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, १५ सप्टेंबर रोजी पाकिस्तान नौदलाचा 'सी स्पार्क-२६' हा युद्धसराव सुरू होता. हा सराव पाकिस्तानच्या विशेष आर्थिक क्षेत्रात होत असताना भारतीय युद्धनौकेने आक्रमक आणि धोकादायक पद्धतीने हालचाल केल्यामुळे धडक झाली, असा पाकिस्तानचा दावा आहे. या घटनेला पाकिस्तानने 'अत्यंत प्रक्षोभक आणि अस्वीकार्य' कृती संबोधले असून, आंतरराष्ट्रीय सागरी कायदा तसेच १९९१ मधील भारत-पाकिस्तान कराराचे उल्लंघन झाल्याचा आरोप केला आहे.

भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार, भारतीय नौदलाची युद्धनौका उत्तर अरबी समुद्रात नियमित गस्तीच्या मोहिमेवर होती. त्यावेळी पाकिस्तानचे 'पीएनएस हुनैन' हे जहाज वेगाने भारतीय युद्धनौकेच्या जवळ आले आणि असुरक्षित पद्धतीने हालचाल केल्यामुळे दोन्ही जहाजांची किरकोळ धडक झाली. भारतीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतीय युद्धनौकेचे कोणतेही मोठे नुकसान झालेले नाही. धडकेनंतरही भारतीय जहाजाने आपली नियमित मोहीम सुरू ठेवली. दुसरीकडे, पाकिस्तानी जहाजाचे नुकसान झाल्याचे भारतीय सूत्रांचे म्हणणे असून, त्याला परत तळाकडे जावे लागल्याचे सांगण्यात आले आहे.

ही घटना ओमानच्या आखातापासून सुमारे १२० सागरी मैल अंतरावर, उत्तर अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात घडल्याचे भारताचे म्हणणे आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने या घटनेनंतर पाकिस्तानच्या नौदलाच्या वर्तनाला 'अस्वीकार्य आणि अव्यावसायिक' ठरवत निषेध नोंदवला. तसेच अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी संबंधित करारातील तरतुदींचे पालन करण्याची गरज पाकिस्तानला सांगण्यात आली.

त्यामुळे या घटनेबाबत दोन्ही देशांच्या दाव्यांमध्ये मोठी तफावत दिसून येत आहे. भारताच्या मते ही घटना आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात घडली आणि पाकिस्तानी जहाजाच्या असुरक्षित हालचालीमुळे धडक झाली. पाकिस्तानच्या मते मात्र घटना त्यांच्या विशेष आर्थिक क्षेत्रात सुरू असलेल्या नौदल सरावादरम्यान घडली आणि भारतीय युद्धनौकेच्या हालचाली त्यासाठी कारणीभूत ठरल्या. या परस्परविरोधी दाव्यांमुळे घटनेचे नेमके कारण आणि घटनाक्रम याबाबत अधिकृत पातळीवरील तपशीलाकडे लक्ष लागले आहे. त्यामुळे या घटनेबाबत दोन्ही देशांच्या दाव्यांमध्ये मोठी तफावत दिसून येत आहे. भारताच्या मते ही घटना आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात घडली आणि पाकिस्तानी जहाजाच्या असुरक्षित हालचालीमुळे धडक झाली.

# तृणमूल काँग्रेस हे नाव आणि पक्षचिन्ह निवडणूक आयोगाने गोठवलं



### संघटनात्मक वर्चस्वाचा वाद

तृणमूल काँग्रेसमधील हा संघर्ष केवळ निवडणूक चिन्हापुरता मर्यादित नसून पक्षाच्या संघटनात्मक नियंत्रणाशी संबंधित आहे. रितब्रत बॅनर्जी यांच्या गटाने २२ जून रोजी बंडखोर नेत्यांची बैठक घेऊन स्वतंत्र राष्ट्रीय कार्यकारिणी स्थापन करण्याची घोषणा केली होती. या बैठकीत अरूप रॉय यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. रितब्रत बॅनर्जी गटाने पक्षाच्या घटनेचा हवाला देत राष्ट्रीय कार्यकारिणीची मुदत संपल्याचा दावा केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, फेब्रुवारी २०२२ मध्ये स्थापन झालेल्या कार्यकारिणीची मुदत फेब्रुवारी २०२५ मध्ये संपली होती आणि त्यानंतर नव्या कार्यकारिणीची घटनात्मक पद्धतीने निवड झाली नाही.

**महाईन्यूज** | नवी दिल्ली

**पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत संघर्षाला आता निवडणूक आयोगाच्या निर्णयामुळे नवे वळण मिळाले आहे. निवडणूक आयोगाने गुरुवारी (१७ सप्टेंबर) 'ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' या पक्षाच्या नावावर तसेच 'फुले आणि गवत' या पारंपरिक निवडणूक चिन्हावर अंतरिम स्वरूपात स्थगिती दिली आहे. त्यामुळे ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गट तसेच रितब्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील प्रतिस्पर्धी गटाला आगामी पोटनिवडणुकांमध्ये तृणमूल काँग्रेसचे विद्यमान नाव आणि चिन्ह वापरता येणार नाही.**

पश्चिम बंगालमधील नंदीग्राम आणि रेझीनगर विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुका ६ ऑक्टोबर रोजी होणार आहेत. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही गटांनी पक्षाच्या नावावर, संघटनात्मक नियंत्रणावर आणि निवडणूक चिन्हावर आपापला दावा केला होता. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर निवडणूक आयोगाने अंतिम निर्णय होईपर्यंत दोन्ही गटांना समान स्थितीत ठेवण्याच्या उद्देशाने अंतरिम व्यवस्था लागू केली आहे.

आयोगाच्या आदेशानुसार, दोन्ही गटांना त्यांच्या स्वतंत्र गटांसाठी तीन-तीन नावांचे पर्याय द्यावे लागणार आहेत. त्याचप्रमाणे निवडणूक आयोगाच्या उपलब्ध मुक्त चिन्हांच्या यादीतून तीन-तीन निवडणूक चिन्हांचे पर्यायही सादर करावे लागणार आहेत. हे पर्याय १८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यापैकी एका नावाला आणि एका चिन्हाला आयोगाकडून मान्यता दिली जाऊ शकते.

आयोगाने स्पष्ट केले आहे की, अंतिम निर्णय होईपर्यंत कोणत्याही गटाला 'ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' हे नाव वापरता येणार नाही. तसेच 'फुले आणि गवत' हे पक्षासाठी राखीव असलेले चिन्हही दोन्ही गटांना वापरता येणार नाही. पोटनिवडणुकीच्या काळात दोन्ही गटांना स्वतंत्र नाव आणि स्वतंत्र निवडणूक चिन्हासह मैदानात उतरावे लागणार आहे.

मात्र, ममता बॅनर्जी यांच्या गटाने हा दावा फेटाळला आहे. पक्षाच्या घटनेत नंतर करण्यात आलेल्या सुधारणांचा प्रतिस्पर्धी गटाने विचार केलेला नाही, असा युक्तिवाद ममता गटाकडून करण्यात आला आहे. तसेच २२ जूनची बैठक पक्षाच्या घटनेनुसार झालेली वैध संघटनात्मक प्रक्रिया नसल्याचेही या गटाचे म्हणणे आहे. या वादावर निवडणूक आयोगाने दोन्ही गटांकडून कागदपत्रे आणि आपापल्या दाव्यांच्या समर्थनार्थ माहिती मागवली होती. १६ सप्टेंबर रोजी अतिरिक्त कागदपत्रे सादर करण्याची मुदत संपली. त्यानंतर दोन्ही गटांची सुनावणी घेण्यात आली. याच काळात नंदीग्राम आणि रेझीनगर पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रियाही सुरू होती. यापूर्वी दोन्ही गटांकडून तृणमूलच्या विद्यमान नाव आणि चिन्हावर दावा करण्यात आला होता.

# अनंत नाग यांना 'दादासाहेब फाळके पुरस्कार'



भारतीय चित्रपटसृष्टीतील अतुलनीय आणि उत्कृष्ट योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांची चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या 'दादासाहेब फाळके पुरस्कारा'साठी निवड करण्यात आली आहे. २२ सप्टेंबर रोजी गुजरातमधील केवडिया येथे आयोजित ७२व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. 'प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो'ने (PIB) बुधवारी अधिकृतरीत्या या पुरस्काराची घोषणा केली.

अनंत नाग यांना हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे 'एक्स'वर (ट्विटर) पोस्ट करत मनःपूर्वक अभिनंदन केले. "दिग्गज अभिनेते अनंत नाग यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन. अनेक दशकांपासून त्यांच्या सहज अभिनयाने, अष्टपैलूत्वाने आणि उत्कृष्ट कामगिरीने भारतीय चित्रपटसृष्टीवर, विशेषतः कन्नड सिनेसृष्टीवर खोलवर प्रभाव पाडला आहे. त्यांनी साकारलेल्या प्रत्येक भूमिकेत एक दुर्मिळ खोली आणि अस्सलपणा जाणवला. एका खऱ्या अर्थाने श्रेष्ठ कलाकारासाठी हा अत्यंत योग्य सन्मान आहे," अशा शब्दांत पंतप्रधानांनी त्यांच्या अभिनय प्रवासाचा गौरव केला.

४ सप्टेंबर १९४८ रोजी जन्मलेल्या अनंत नाग (नागरकट्टे) यांनी १९६७ मध्ये आपल्या अभिनय प्रवासाला सुरुवात केली. गेल्या सहा दशकांत त्यांनी ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये विविधांगी भूमिका साकारल्या, ज्यामध्ये २५० हून अधिक कन्नड चित्रपटांचा समावेश आहे. कन्नडव्यतिरिक्त त्यांनी हिंदी, मराठी, तेलुगू, तमिळ, मल्याळम आणि इंग्रजी चित्रपटांतही आपल्या अभिनयाची छाप पाडली. आर. के. नारायण यांच्या साहित्यावर आधारित गाजलेल्या 'मालगुडी डेज' या दूरदर्शन मालिकेतील त्यांची भूमिका विशेष लोकप्रिय ठरली. त्यांना कारकिर्दीत पाच वेळा 'कर्नाटक राज्य चित्रपट पुरस्कार' मिळाला असून, २०२५ मध्ये केंद्र सरकारने त्यांना 'पद्मभूषण' या नागरी सन्मानानेही गौरविले आहे.



# करीनाचा मोठा खुलासा

बॉलिवूडमधील लोकप्रिय जोड्यांपैकी एक म्हणजे अभिनेत्री करीना कपूर आणि अभिनेता सैफ अली खान. दोघांनी अनेक वर्षांपूर्वी लग्न केलं असून आजही त्यांची जोडी चाहत्यांमध्ये चर्चेत असते. दोघेही आपल्या कामात व्यस्त असतात. अनेकदा सोशल मीडियावरही ते एकमेकांसोबतचे फोटो शेअर करताना दिसतात. एकमेकांचं कौतुक करतानाही ते दिसतात. मात्र, इतर जोड्यांप्रमाणे सैफ आणि करीनामध्येही काही गोष्टींवरून मतभेद होतात. खुद्द करीनानेच एका मुलाखतीत याबाबत खुलासा केला होता. करीनाला एका मुलाखतीत सैफसोबत तिचं भांडण होतं का, असा प्रश्न विचारण्यात आला होता. तसेच, दोघांमध्ये भांडण होत असेल तर ते नेमकं कोणत्या विषयावरून होतं, असंही तिला विचारण्यात आलं. यावर करीनाने अगदी स्पष्टपणे उत्तर दिलं. दोघं जेव्हा एकमेकांच्या कामाबद्दल चर्चा करतात, तेव्हा अनेकदा त्यांच्यात मतभेद होतात, असं तिने सांगितलं. करीनाच्या म्हणण्यानुसार, एकाच घरात दोन अभिनेते राहत असतील, तर कामाच्या विषयावरून चर्चा आणि मतभेद होणं स्वाभाविक आहे. ती म्हणाली की, सैफच्या चित्रपटाचा प्रोमो तिला अनेकदा आवडत नाही. त्याचप्रमाणे सैफला तिच्या चित्रपटाचा प्रोमो आवडत नाही. त्यामुळे चित्रपट किंवा कामाशी संबंधित विषय निघाला की दोघांमध्ये वाद होण्याची शक्यता असते. करीनाने स्वतःच्या आणि सैफच्या काम करण्याच्या पद्धतीमधील फरकही सांगितला. तिच्या मते, ती एखाद्या भूमिकेसाठी जास्त विचार करत नाही. ती एखाद्या भूमिकेत लगेच शिरते आणि काम झाल्यावर लगेच त्यातून बाहेरही येते. याउलट सैफ आपल्या भूमिकेसाठी खूप तयारी करतो. तो भूमिकेचा अभ्यास करतो आणि त्यासाठी बराच वेळ देतो. करीना म्हणाली की, चित्रपटाच्या विषयावर चर्चा करताना त्यांचे विचार अनेकदा वेगळे असतात. त्यामुळे दोघांमध्ये चर्चा होताना मतभेद होतात. मात्र, हे त्यांच्या नात्यातील नेहमीचे छोटे-मोठे मतभेद असल्याचं तिच्या बोलण्यातून स्पष्ट होतं.



## नयनताराचा दमदार लूक

दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील अभिनेत्री नयनतारा हिच्या 'महाशक्ति' या बहुप्रतीक्षित सिनेमाची अनेकजण आतुरतेने वाट पाहत आहे. याचदरम्यान, या सिनेमाचा टीझर रिलीज झाला आहे. यातील तिच्या लुकने अनेकांचे लक्ष वेधून घेतले आहे. नयनताराचा लूक, अभिनयाची झलक आणि सिनेमाची भव्यता पाहता 'महाशक्ति' हा सिनेमा मोठ्या पडद्यावर खास ठरण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, नयनताराचा हा अवतार तिच्या याआधीच्या भूमिकांपेक्षा पूर्णपणे वेगळा असल्याचे पाहायला मिळत आहे. 'महाशक्ति'चा संबंध 'हनुमान अंश' या सिनेमाच्या विश्वाशी असल्यामुळे चाहत्यांमध्ये या सिनेमाबद्दल विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे. नयनतारा या सिनेमात एका दैवी शक्तिशी जोडलेल्या भूमिकेत दिसणार आहे. 'हनुमान अंश' या चित्रपटाने देवभक्ती आणि आस्थेच्या जोरावर प्रेक्षकांची मनं जिंकल्यानंतर आता मोठ्या पडद्यावर आणखी एका देवी शक्तीचे आगमन होणार असल्याने अनेकांची उत्सुकता वाढली आहे. 'महाशक्ति'च्या टीझरमध्ये व्हिज्युअल्स, भव्य सीन्स आणि रहस्याने भरलेल्या जगाची झलक पाहायला मिळते. 'महाशक्ति'साठी निर्मात्यांनी मोठ्या प्रमाणावर तयारी केली आहे. हा चित्रपट नोव्हेंबरमध्ये हिंदी, तमिळ, तेलगू, मल्याळम आणि कन्नड या पाच भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. उत्तर भारतात या चित्रपटाच्या वितरणाची जबाबदारी 'एए फिल्म्स' सांभाळणार आहे.

# पृथ्वी शॉचा साखरपुडा ६ महिन्यांत मोडला!

## आकृती अग्रवालची पोस्ट चर्चेत; वेगळ्या ध्येयांमुळे विभक्त होण्याचा निर्णय

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारताचा क्रिकेटपटू पृथ्वी शॉ क्रिकेटपेक्षाही त्याच्या वैयक्तिक आयुष्यातील घडामोडींमुळे अधिक चर्चेत आहे. पृथ्वी शॉचं वैयक्तिक आयुष्य आता पुन्हा चर्चेचा विषय ठरलं आहे, यामागाचं कारण म्हणजे ६ महिन्यांतच पृथ्वी शॉचा साखरपुडा मोडला आहे. पृथ्वी शॉने काही महिन्यांपूर्वीच इन्फ्लुएन्सर व अभिनेत्री आकृती अग्रवाल हिच्याबरोबर साखरपुडा केल्याचे फोटो शेअर केले होते. आता आकृती अग्रवालने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत साखरपुडा मोडल्याचं जाहीर केलं आहे.**



पृथ्वी शॉ आणि आकृती अग्रवाल यांचा ८ मार्च २०२६ रोजी साखरपुडा झाला होता. या जोडप्याने २७ ऑगस्ट २०२५ मध्ये गणेश चतुर्थीच्या निमित्ताने आपल्या नात्याची अधिकृत घोषणा केली होती. आता, साखरपुड्यानंतर सहा महिन्यांनी दुर्दैवाने गणेशोत्सवाच्या सणादरम्यान दोघेही वेगळे झाल्याची घोषणा केली आहे.

आकृती अग्रवालने इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये लिहिलं, "अतिशय जड अंतःकरणाने मला सांगावं लागत आहे की, मी आणि माझ्या होणाऱ्या नवऱ्याने आपल्या भविष्यातील वेगवेगळ्या ध्येयांमुळे आणि सध्याच्या परिस्थितीमुळे वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. आमच्यात एकमेकांबद्दल प्रेम आणि काळजी असली, तरी आमचे मार्ग एकत्र जाण्यासाठी नाहीत, हे आम्ही स्वीकारलं आहे. आमच्यावर असलेल्या जबाबदाऱ्या आणि सध्या आम्ही ज्या परिस्थितीतून जात आहोत, त्या पार्श्वभूमीवर आम्ही परस्पर संमतीने वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे."

तिने पुढे लिहिलं, "यापुढील आयुष्यात आम्हा दोघांनाही सुख, शांती आणि आनंद मिळावा, हीच माझी मनापासून इच्छा आहे." तिने पुढे म्हटलं, "या कठीण काळात कृपया आमच्या गोपनीयतेचा आदर करा. आमच्या निर्णयामागील कारणांबाबत कोणत्याही प्रकारचे अंदाज किंवा तर्क लावू नका, ही नम्र विनंती. आम्हाला समजून घेतल्याबद्दल धन्यवाद."

पृथ्वी शॉ आणि आकृती अग्रवाल यांनी मार्च २०२६ मध्ये त्यांच्या साखरपुड्याची घोषणा केली आणि सोशल मीडियावर त्या समारंभाचे फोटो शेअर केले. त्यानंतर जुलैमध्ये, आकृती अग्रवालच्या काही सोशल मीडिया पोस्ट्समुळे लोकांचे लक्ष त्यांच्या नात्याकडे वेधलं गेलं आणि त्यावरून विविध तर्क-वितर्क लढवले जाऊ लागले. त्यावेळी, त्या पोस्ट्सचा पृथ्वी शॉ याच्याशी अधिकृतपणे कोणताही संबंध जोडला गेला नव्हता. पण पृथ्वी शॉने तिची फसवणूक केली का, अशा चर्चा सोशल मीडियावर रंगल्या होत्या. त्यावरून त्या दोघांच्या नात्यामध्ये अंतर आल्याच्या चर्चांनाही उधाण आलं होतं.

आकृती अग्रवालच्या आता या ब्रेकअप पोस्टनंतर या जोडप्याने परस्पर संमतीने त्यांचं नातं संपवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी विभक्त होण्याचं कारण उघड केलं नसलं तरी, त्यांनी गोपनीयता राखण्याची केलेली विनंती हे दर्शवते की त्यांना या विषयावर अधिक चर्चा करायची नाही.

---

# कॅनडाला जाण्यासाठी सज्ज नमन धीरचा टीम इंडियापर्यंतचा प्रवास

**महाईन्यूज । मुंबई**

**हार्दिक पंड्या आणि ऋषभ पंत या स्टार खेळाडूंचा विचार न करता निवडसमितीने वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी युवा नमन धीरला संधी दिली आहे. बॅटिंग ऑलराऊंडर नमन धीरसाठी भारतीय संघात निवड होण्याची ही पहिलीच वेळ आहे. चार वर्षांपूर्वी कॅनडाला कायमस्वरुपी जाण्यासाठी नमन धीर आता टीम इंडियासाठी खेळताना दिसू शकतो.**



U16 वयोगट स्पर्धांमध्ये खेळलेल्या नमनकडे त्यानंतर चार वर्ष दुर्लक्ष करण्यात आलं. याचं कारण म्हणजे फरीदकोट हा छोटा जिल्हा मानला जातो. चार वर्ष संधी मिळत नसलेल्या नमनने कॅनडाला जायचं ठरवलं. २०२२ मध्ये त्याने कॅनडाचं कायमस्वरुपी नागरिकत्व मिळावं यासाठी प्रयत्न सुरू केले.

पंजाबमधल्या ५० टक्के युवकांना कॅनडा गाठायचं असतं. मीही त्यांच्यापैकीच एक होतो. २०२२ मध्ये मी क्रिकेट जवळपास सोडून दिलं होतं. माझी बहीण कॅनडातल्या एडमॉन्टन भागात राहते. तिकडेच जाण्याचा माझा विचार होता. माझ्या वडिलांनी सांगितलं- तू एक वर्ष क्रिकेटला दे. प्रचंड मेहनत कर. वर्षभरानंतर आपण निर्णय घेऊ. मी त्यांचा सल्ला मानला. २०२२ मध्ये मी पंजाबसाठी रणजी पदार्पण केलं. २०२३ मध्ये मुंबई इंडियन्स संघाने मला निवडलं.

नमनने वडील नरेश एका मेडिकल शॉपमध्ये काम करतात. मी त्याला क्रिकेट खेळायला सोडायचो तेव्हा लोक मला म्हणायचे, 'तुम्ही त्यांचं आयुष्य वाया घालवत आहात. फरीदकोटमधून कोणी पंजाबसाठी देखील खेळलं नाहीये. भारतीय संघासाठी खेळणं दूर राहिलं. त्यांच्या टीकेचं कौतुकात रुपांतर होईल हे मला माहिती होतं. नमन पंजाबसाठी खेळू लागला. मुंबई इंडियन्स संघाने त्याला संघात घेतलं. त्यावेळी टीका करणारी माणसं आता नमनचं कौतुक करतात. मेडिकल शॉपमध्ये काम करणाऱ्या एका सर्वसामान्य माणसाचा मुलगा क्रिकेटच्या माध्यमातून नाव कमावतो आहे. याचा प्रचंड आनंद आणि अभिमान आहे'.

'आमची परिस्थिती बेतास बेत होती. नमनची आजी (धरम पाल सेठी) यांनी पुढाकार घेतला. त्याला क्रिकेट खेळू दे असं त्यांनीच सांगितलं. मला दोन मुलीही आहेत. एक कॅनडात असते, दुसरी ऑस्ट्रेलियात. क्रिकेट हा खूप खर्चिक खेळ आहे. नमन पंजाबसाठी खेळू लागला, परिस्थिती बदलू लागली. मुंबई इंडियन्स संघाने ५.२५ कोटींचं कंत्राट दिलं. त्याने सगळं चित्रच बदललं. प्रशिक्षक गगन सिधू यांनी नमनच्या कारकिर्दीत मोलाची भूमिका बजावली आहे. मात्र ३६व्या वर्षी त्यांचं आकस्मिक निधन झालं. नमनसाठी हा मोठा धक्का होता', असं त्यांनी सांगितलं.

फरीदकोटचं U16, U15 तसंच रणजी स्पर्धेत पंजाबचं प्रतिनिधित्व करणारा नमन पहिलाच आहे. या भागातून आयपीएल संघासाठी खेळणाराही नमन पहिलाच खेळाडू आहे. लवकरच भारतीय संघासाठी खेळण्याचं त्याचं स्वप्नही पूर्ण होऊ शकतं.

२०२४ मध्ये नमनने आयपीएल स्पर्धेत मुंबई इंडियन्ससाठी पदार्पण केलं. २६वर्षीय नमन डोमेस्टिक क्रिकेटमध्ये पंजाबसाठी खेळतो. काही दिवसांपूर्वी आटोपलेल्या शेर ए पंजाब टी२० लीग स्पर्धेत नमनने अमृतसर सूरमा संघाचं नेतृत्व केलं. याबरोबरीने त्याने स्पर्धेत सर्वाधिक धावा केल्या. या स्पर्धेत त्याने ६४ चेंडूत १७३ धावांची तडाखेबंद खेळी साकारली होती.

याच स्पर्धेत आधीच्या वर्षांमध्ये त्याची कामगिरी चांगली झाली होती. २०२४ मध्ये मुंबई इंडियन्सने त्याच्या या कामगिरीची दखल घेत त्याला ताफ्यात सामील केलं. त्यावर्षी तो ७ सामने खेळला. लखनौ सुपरजायंट्स संघाविरुद्ध खेळताना त्याने २८ चेंडूत ६२ धावांची आक्रमक खेळी केली होती.

यानंतर त्याला रीलिज करण्यात आलं. मात्र मुंबई इंडियन्स संघव्यवस्थापनाने राईट टू मॅच कार्डाचा वापर करत नमनला आपल्याकडेच राखलं. यासाठी मुंबईने ५.२५ कोटी रुपये मोजले. २०२५ हंगामात नमन १६ सामने खेळला. त्याने १८२च्या स्ट्राईकरेटने २५२ धावा केल्या.

दडपणाच्या क्षणीही नमन शांतपणे खेळतो. चांगल्या पद्धतीने डावाची आखणी करतो. एकेरी, दुहेरी धावा आणि चौकार-षटकार यांचा सुरेख मिलाफ साधतो. मधल्या षटकांमध्येही तो गॅप वसूल करत चौकार-षटकार लगावतो असं मुंबई इंडियन्सचा कोच कायरेन पोलार्डने सांगितलं.

नमनने १४ लिस्ट ए सामन्यांमध्ये ३९च्या सरासरीने ३५१ धावा केल्या आहेत. फलंदाजीच्या बरोबरीने नमन उत्कृष्ट क्षेत्ररक्षक आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

। शुक्रवार ।

दि. 18 सप्टेंबर 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# कृत्रिम बुद्धिमत्तेचा वेग व बदलांवर चर्चा करा: दीपक शिंगण

## पीसीयूमध्ये स्कूल ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्सचा 'दीक्षारंभ' संपन्न

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील बदलांवर चिकित्सक पद्धतीने लक्ष ठेवून विद्यार्थ्यांनी याविषयी सतत जिज्ञासा बाळगावी, नवकल्पनांना प्रोत्साहन द्यावे आणि तांत्रिक घडामोडींचा सातत्याने अभ्यास करावा. भारताला जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात नेतृत्व करण्याची मोठी संधी असून, त्यासाठी विद्यार्थ्यांनी नवोन्मेषी दृष्टिकोन स्वीकारावा, असे क्रिस्टाचे सीनियर डायरेक्टर ऑफ इंजिनिअरिंग दीपक शिंगण यांनी सांगितले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) साते, मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठात (पीसीयू) स्कूल ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्सच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ चा प्रथम वर्ष 'दीक्षारंभ' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी अक्कॉप्स सिस्टीम्सचे सहसंस्थापक विजेंद्र यादव, स्केल्ड ॲजाइल ट्रान्सफॉर्मेशनचे सीनियर व्हाइस प्रेसिडेंट डॉ. महेंद्र रामदासी, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, कुलसचिव डॉ. अनिल महेश्वरी आणि स्कूल ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्सचे प्रमुख डॉ. कमलेश मेश्राम आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी पीसीईटीच्या ३५ वर्षांहून अधिक काळाच्या शैक्षणिक परंपरेविषयी माहिती दिली. उद्योगभिमुख अभ्यासक्रम, जपानी व कोरियन उद्योगांसोबतचे सहकार्य, जागतिक संधी आणि कौशल्याधारित शिक्षणाचा लाभ घेत विद्यार्थ्यांनी स्वतःला सक्षम बनवावे, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. कमलेश मेश्राम यांनी विद्यार्थ्यांनी हॅकेथॉन, उद्योगमान्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम, क्लाउड कॉम्प्युटिंग, डेटा सायन्स आणि नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने करत यशस्वी करिअर घडवावे, असा सल्ला दिला.

डॉ. महेंद्र रामदासी म्हणाले, "विद्यार्थ्यांनी व्यावसायिक आयुष्यातील वेग आणि बदल स्वीकारले पाहिजेत. तांत्रिक कौशल्यांसोबतच सातत्याने शिकणे, पुन्हा शिकणे (Re-learning) आणि आवश्यकतेनुसार जुन्या पद्धती विसरून नव्या पद्धती स्वीकारणे (Unlearning) हीच यशस्वी व्यावसायिकाची खरी ओळख आहे. बदल हा व्यावसायिक जीवनाचा अविभाज्य भाग असल्याने विद्यार्थ्यांनी त्यासाठी सदैव तत्पर राहावे."

विजेंद्र यादव यांनी सायबर सुरक्षा, डिजिटल पायाभूत सुविधा आणि भारतासाठी स्वदेशी सायबर सुरक्षा उपायांची गरज यावर मार्गदर्शन केले. "विद्यार्थ्यांनी मजबूत प्रोग्रामिंग कौशल्ये, मूलभूत संकल्पनांवरील प्रभुत्व आणि समस्यांकडे जिज्ञासूपणे पाहण्याची वृत्ती विकसित केली पाहिजे. भविष्यातील डिजिटल युगामध्ये सायबर सुरक्षा अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे," असे ते म्हणाले. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला.

हा कार्यक्रम पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे विश्वस्त व कुलपती हर्षवर्धन पाटील, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आणि कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

# नूतन अभियांत्रिकीमध्ये ड्रोन आणि एआय तंत्रज्ञान बूटकॅम्पचे यशस्वी आयोजन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड एज्यकेशन ट्रस्ट आणि नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ संचालित नूतन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी तळेगाव मध्ये सी-डॅक पुणे यांच्या सहकार्याने ड्रोन आणि एआय तंत्रज्ञान या विषयावरील पाच दिवसीय बूट कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते . या बूटकॅम्पमध्ये ३५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना ड्रोन तंत्रज्ञानाच्या निर्मितीपासून त्याच्या विविध प्रत्यक्ष उपयोगांपर्यंतचे प्रशिक्षण तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून देण्यात येणार आले. बूटकॅम्पमध्ये ड्रोन असेंब्ली, फ्लाइट डायनॅमिक्स, एआय आधारित कॉम्प्युटर व्हिजन, ऑब्जेक्ट डिटेक्शन, इमेज प्रोसेसिंग,आयओटी तसेच इंटेलिजंट डिसिजन मेकिंग यांसारख्या विषयांचा समावेश आहे.**



उद्घाटन प्रसंगी अभियांत्रिकीचे संचालक डॉ. प्रमोद पाटील, सी-डॅक पुणेचे सहव्यवस्थापक कौशल शर्मा, आदित्य खापरे, संशोधन विकास विभागाचे अधिष्ठाता डॉ. विलास देवतारे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. सागर शिंदे, संगणक विभागाचे विभाग प्रमुख डॉ. राहुल पाटील, बूटकॅम्पचे समन्वयक प्रा. प्रितम आहिरे, प्रा. अतुल मायराळे व प्रा. स्पंदन वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकामध्ये डॉ. राहुल पाटील यांनी आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात बहुविद्याशाखीय शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. ड्रोन तंत्रज्ञान हे केवळ एखाद्या एका शाखेपुरते मर्यादित नसून संगणक अभियांत्रिकी, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, इलेक्ट्रॉनिक्स, कम्युनिकेशन, आयओटी आणि ऑटोमेशन अशा विविध क्षेत्रांचा संगम असल्याचे त्यांनी सांगितले.

अभियांत्रिकीचे संचालक डॉ. प्रमोद पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना कौशल्याधारित, अनुभवाधारित आणि बहुविद्याशाखीय शिक्षण देण्याची गरज व्यक्त केली. ड्रोन व एआय तंत्रज्ञानाच्या वाढत्या व्याप्तीवर प्रकाश टाकला.

सी-डॅक पुणेचे सहव्यवस्थापक कौशल शर्मा यांनी सी-डॅकच्या वाटचालीची व विविध तंत्रज्ञान क्षेत्रातील योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच सी-डॅक मधील करिअरच्या विविध संधी, अत्याधुनिक तंत्रज्ञानातील कामाचे स्वरूप आणि विद्यार्थ्यांनी भविष्यातील करिअरसाठी आवश्यक कौशल्ये कशी विकसित करावीत याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

या बूटकॅम्प दरम्यान सी-डॅक चे तज्ज्ञ प्रशिक्षक विद्यार्थ्यांना ड्रोन तयार करणे, असेंब्ली, ड्रोनचे उड्डाण, यूएएस तंत्रज्ञान तसेच एआय आधारित विविध अनुप्रयोगांचे प्रात्यक्षिक व प्रत्यक्ष प्रशिक्षण देणार आले .विद्यार्थ्यांना भविष्यातील तंत्रज्ञानासाठी सज्ज करणारा आणि ड्रोन, एआय सारख्या स्वायत्त प्रणालींच्या क्षेत्रातील नव्या संधींची दारे खुली करणारा हा बूटकॅम्प विद्यार्थ्यांच्या तंत्रज्ञानाधारित शिक्षणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष संजय (बाळा) भेगडे, उपाध्यक्ष नंदकुमार शेलार, सचिव संतोष खांडगे खजिनदार तसेच अभियांत्रिकीच्या कार्यकारी समितीचे चेअरमन राजेश म्हस्के, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन व सातत्यपूर्ण सहकार्य लाभत आहे. . त्यांच्या दूरदृष्टी आणि तंत्रज्ञानाभिमुख शैक्षणिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्याच्या भूमिकेमुळे विद्यार्थ्यांसाठी अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांना चालना मिळत आहे.

# एमआयटीमध्ये 'कुरुक्षेत्र २.०' हॅकेथॉन उत्साहात

## पाच राज्यांतील १५० संघांचा सहभाग; विविध विषयगटांत विद्यार्थ्यांनी सादर केले प्रकल्प

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, आळंदी (देवाची) येथे ११ व १२ सप्टेंबर २०२६ रोजी "कुरुक्षेत्र २.० - हॅकफेस्ट" हा राष्ट्रीय स्तरावरील २४ तासांचा हॅकेथॉन उत्साहात पार पडला. महाविद्यालयाच्या इन्स्टिट्यूशन्स इनोवेशन कौन्सिल (आयआयसी) अंतर्गत कार्यरत असलेल्या मोझिला एमआयटीएसीएससी क्लबने या स्पर्धेचे आयोजन केले होते.**



### विजेत्या संघांची नावे :

कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग व डेटा सायन्स या विषयगटात डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे येथील 'कोड एपेक्स' (श्रावणी सूर्यवंशी, सार्थक कापडणे, पायल किंगे, तनिषा शेलार) या संघाने प्रथम क्रमांक व १५,००० रुपयांचे बक्षीस पटकावले. मुंबईच्या डी. जे. संघवी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या 'चारकोल' संघाने (आर्यन रेड्डी, दानिश जैन, अनिकेत नायर, झेन नाझरेथ) द्वितीय क्रमांक (१०,००० रु.) पटकावला, तर हैदराबादच्या सीएमआर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या 'टेक्नो वेव्ह' संघाने (परमीत कौर, व्ही. एस. पी. श्री हर्षा, तनिष्क कंदुला) तृतीय क्रमांक (७,००० रु.) मिळवला.

या स्पर्धेत १५० संघांतील एकूण ५२७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू व राजस्थान या पाच राज्यांतील ७६ महाविद्यालयांतून विद्यार्थी सहभागी झाले होते. आयआयटी मद्रासच्या संघानेही स्पर्धेत सहभाग घेतला. एकट्या पुणे जिल्ह्यातून ११८ संघ सहभागी झाले, तर हैदराबाद, बेंगळुरू, म्हैसूर, चेन्नई, तिरुचिरापल्ली, नांदेड, कोल्हापूर, सांगली, नाशिक, नागपूर, सोलापूर व सीकर येथूनही संघ दाखल झाले होते. ही स्पर्धा तीन विषयगटांमध्ये घेण्यात आली - कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग (एजंटिक एआय व डेटा सायन्ससह), सायबर सुरक्षा व ब्लॉकचेन, आणि ओपन इनोव्हेशन. विद्यार्थ्यांनी सलग २४ तास काम करून प्रत्यक्ष समस्यांवर आधारित सॉफ्टवेअर प्रणाली विकसित केल्या.

प्रत्येक विषयगटातील तीन विजेत्या संघांना मिळून एकूण एक लाख रुपयांची बक्षिसे वितरित करण्यात आली. "थिंक इट, बिल्ड इट, ब्रेक इट, फिक्स इट" या संकल्पनेवर आधारित या स्पर्धेतून विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यपूर्ण विचार, सांघिक काम व समस्या सोडवण्याची वृत्ती वाढीस लागावी, हा उद्देश होता. "कुरुक्षेत्र २.०" या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक (टायटल स्पॉन्सर) कोड शेफ हे होते. संस्कृती ज्वेलर्स, ब्रू अँड बझ कॅफे, जिसा सॉफ्टेक, ॲमकॅट व क्रिएटिव्ह क्रोज यांनी प्रायोजकत्वाच्या माध्यमातून सहकार्य केले. आघाडीच्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील २० परीक्षकांच्या मान्यवर पॅनेलने स्पर्धेचे परीक्षण केले.

याप्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे म्हणाले की, एवढ्या मोठ्या प्रमाणातील यश काही मोजक्या व्यक्तींच्या प्रयत्नांतून कधीच साध्य होत नाही. उपसंचालक, अधिष्ठाता, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी स्वयंसेवक यांच्या परिश्रमामुळेच ५२७ पाहुण्यांची चोवीस तास उत्तम व्यवस्था राखली गेली, असे सांगून त्यांनी या सर्वांच्या कामाचे कौतुक केले. तसेच डॉ. सुनील कराड यांच्या सातत्यपूर्ण प्रोत्साहनाबद्दल व पाठिंब्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. उपसंचालक डॉ. अक्षदा कुलकर्णी, आयआयसीचे उपाध्यक्ष श्री. अभिजित नेटके व आयआयसी संयोजक डॉ. संदीप ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. कविता महाजन यांनी शिक्षक समन्वयक, तर प्रा. सोनाली वाळसे यांनी शिक्षक सहसमन्वयक म्हणून कार्यक्रमाचे समन्वयन केले. विद्यार्थी समन्वयक म्हणून श्रुतिका उमेश सागरशेट्टी (तृतीय वर्ष बी.एस्सी. डेटा सायन्स) यांनी, तर सहसमन्वयक म्हणून जयदीप बडे व वैष्णवी मुंडे यांनी काम पाहिले.

सायबर सुरक्षा व ब्लॉकचेन या विषयगटात रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या इशांत मेहरा याने एकट्याने सहभागी होत 'ऑर्बिओनिक्स' या नावाने प्रथम क्रमांक व १५,००० रुपयांचे बक्षीस पटकावले. नांदेडच्या ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पसच्या 'टीम समय' संघाने (समय पोवडे, ऋतुजा जाधव, पूनम कुन्हे, गायत्री हिप्पळे) द्वितीय क्रमांक (१०,००० रु.) पटकावला, तर आंबी येथील डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या 'पॅराडॉक्स' संघाने (हिमांशु आयरे, केदार गायकवाड, वेदांत चव्हाण) तृतीय क्रमांक (७,००० रु.) मिळवला.

ओपन इनोव्हेशन या विषयगटात पुण्यातील विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या 'गोल्डमायनर्स' संघाने (संकेत महाजन, ओंकार साठे, पृथ्वीराज गनहाणे, साक्षी खुटवड) प्रथम क्रमांक व १५,००० रुपयांचे बक्षीस पटकावले. ओतूर येथील शरदचंद्र पवार कॉलेजच्या 'झिरोबाइट्स' संघाने (समर्थ राजेंद्र जाधव, केशव पसारे, श्रेयश कुलकर्णी, अमर माने) द्वितीय क्रमांक (१०,००० रु.) पटकावला, तर कीस्टोन स्कूल ऑफ इंजिनिअरिंगच्या 'टीन टायटन्स' संघाने (सिद्धेश पवार, अंतरा केणे, यश शिंदे, अवंती कदम) तृतीय क्रमांक (७,००० रु.) मिळवला. दरम्यान, पुढील "कुरुक्षेत्र ३.०" स्पर्धेचे आयोजन सन २०२७ मध्ये करण्यात येणार असल्याचे महाविद्यालयाने जाहीर केले आहे.

# D. Y. Patil PGDM Institute to Host AICTE–ATAL Faculty Development Programme on AI and Sustainable Business Innovation

**MahaEnews | PIMPRI-CHINCHWAD**

**D. Y. Patil PGDM Institute, Akurdi, Pune, is organizing an AICTE Training and Learning (ATAL) Academy Faculty Development Programme (FDP) on "From Blue Ocean to Green Growth: Leveraging AI for Scalable & Sustainable Business Innovation" from 21st to 26th September 2026 at the institute campus.**




The six-day offline FDP aims to provide faculty members and academic professionals with insights into the emerging applications of Artificial Intelligence (AI) in business innovation, sustainability, entrepreneurship, and responsible growth.

The programme focuses on the transition from creating new and innovative market spaces—Blue Ocean—towards sustainable and responsible business growth—Green Growth. It will explore how AI and emerging technologies can support organizations in developing innovative and scalable business models, enhancing decision-making, improving operational efficiency, and addressing sustainability challenges.

The FDP will feature sessions by academicians, researchers, industry professionals, and subject experts, providing participants with opportunities for knowledge sharing, interactive learning, and professional development. Key areas will include AI-enabled business innovation, sustainable business models, responsible AI, entrepreneurship, emerging technologies, and technology-driven business transformation.

The programme is being conducted under the guidance of Dr. Shalaka Parker, Director, with Dr. Rashmi Prasad, Chief Coordinator, and Dr. Sandeep Sarkale, Co-Coordinator, leading the coordination and execution of the FDP.

The programme reflects the institute's commitment to strengthening faculty development, research, innovation, industry–academia interaction, and technology-enabled management education, while creating a platform for meaningful academic collaboration and knowledge exchange.

For further information regarding the FDP, please contact ***info@dyppgdmi.ac.in*.

# DYPCOE Dominates University Chess

## Girls Win Second Consecutive Title, Boys Complete Golden Hat-Trick

**MahaEnews** | PIMPRI-CHINCHWAD

**D. Y. Patil College of Engineering (DYPCOE), Akurdi has once again stamped its authority on university-level chess, with its Girls' Team winning the Championship for the second consecutive year and the Boys' Team completing a historic three-peat at the Savitribai Phule Pune University Inter-Collegiate Chess Tournament.**



The tournament was held on 11th and 12th September 2026 at MUC College, Pimpri, where both DYPCOE teams displayed outstanding strategic play, confidence, teamwork and consistency to emerge as champions.

The DYPCOE Girls' Chess Team secured the Championship and Gold Medal for the second consecutive year. The winning team comprised Prajakta Jadhav (CS), Lavanya Bhadakwade (ENTC), Prajakta Godhane (IT) and Rajnandini Deokar (IT).

Adding another achievement to the team's success, Prajakta Jadhav (CS) has been selected to represent Savitribai Phule Pune University at the Inter-Divisional Chess Tournament based on her outstanding performance.

The DYPCOE Boys' Chess Team continued its remarkable winning streak by clinching the Championship and Gold Medal for the third consecutive year, creating a historic three-year winning legacy.

The championship-winning team comprised Tanish Gupta (AI-DS), Meet Bhattad (ENTC), Piyush Indrale (AI-DS) and Pranav Patil (IT).

Adding another feather to the team's achievement, Tanish Gupta (AI-DS) has been selected to represent Pune District at the Inter-Zonal Chess Tournament for the second consecutive year. He will participate in the Inter-Zonal Chess Tournament to be held at Nashik.

The outstanding success of both teams is the result of systematic preparation, effective team selection, strategic planning, continuous practice and dedicated guidance from the Department of Physical Education & Sports.

DY Patil Education Complex Trustee Mr. Tejas Patil, Campus Director Admiral (Retd.) Amit Vikram, Principal Dr. Mrs. P. Malati, Dean – Administration Dr. S. S. Sarnobat, Dean – Affairs Dr. Smita Pataskar and Registrar Mr. Bhalerao congratulated both teams and appreciated the players for their outstanding achievements.

Director of Physical Education & Sports Dr. Abaji Subrao Mane played a key role in the success of both teams through systematic planning, effective team selection, strategic guidance, regular monitoring and continuous encouragement of the players.

The Girls' second consecutive championship and Boys' historic third consecutive championship underline DYPCOE's sustained excellence in university-level chess and its commitment to nurturing talented sportspersons.

Two Teams. Two Championships. One Golden Legacy — DYPCOE continues to rule the chessboard!

# Priyadarshani School, Moshi Organised Session on "Understanding Special Education"

**MahaEnews** | PIMPRI-CHINCHWAD

**Priyadarshani School, Moshi is organising an insightful session on "Understanding Special Education" on 12th September to promote greater awareness, sensitivity and inclusivity within the school community.**



The session was conducted by Ms. Medha from Anjali Morris Foundation, who will provide valuable insights into the diverse learning needs of children requiring special educational support. The session will focus on understanding the challenges faced by such children, recognising their individual strengths and needs, and exploring appropriate approaches to support their academic, emotional and social development.

The initiative reflects the school's commitment to creating an inclusive and supportive learning environment, where every child is understood, respected and given opportunities to learn and grow according to their individual potential.

Through such awareness and capacity-building initiatives, Priyadarshani School, Moshi continues to strengthen its efforts towards building a compassionate, inclusive and child-centred educational ecosystem.